# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शालेय शिक्षणातील अपेक्षित बदल

**डॉ. शशिकांत श्रीधर अन्नदाते** सहायक प्राध्यापक बी.ए.बी.एड विभाग (एकात्मिक) महावीर महाविद्यालय, कोल्हापूर

इमेल – shashikantannadate83@gmail.com

---

**प्रास्तविक**

नवीन शैक्षणिक धोरणाचा मसुदा तयार करण्यासाठी केंद्र सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने २४ जून, २०१७ रोजी प्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ डॉ.कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली १२ सदस्यांची समिती नेमली होती. समितीने वेगवेगळ्या घटकाकडून आलेल्या सूचना विचारात घेऊन १५ डिसेंबर, २०१८ रोजी आपला अहवाल मनुष्यबळ विकास मंत्रालयास सादर केला. या अहवालावर २०१९ मध्ये प्रसिद्ध करून त्यावर जनतेच्या सूचनाही मागविण्यात आल्या होत्या. ऑक्टोबर, २०१९ मध्ये सदर धोरणाचा ५५ पानांचा अंतिम मसुदा प्रसिद्ध करण्यात आला आहे. या अंतिम मसुद्यास केंद्रीय मंत्रीमंडळाने २९ जुलै २०२० रोजी मंजुरी दिली आहे. या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० मध्ये पूर्व प्राथमिक ते उच्च शिक्षण अशा सर्व शिक्षणाबाबतची धोरणे त्यात अंतर्भूत आहेत. सदर लेखात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अपेक्षित शालेय शिक्षणावर चर्चा करण्यात आलीआहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० भारताला केंद्रस्थानी मानून अशा शिक्षण प्रणालीची कल्पना करते जी सर्वांना उच्च दर्जाचे शिक्षण प्रदान करून आपल्या राष्ट्राला सातत्याने न्याय्य व चैतन्यमय ज्ञानी समाजामध्ये परिवर्तित करण्यात थेट योगदान देते.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शालेय शिक्षणातील अपेक्षित बदल**

1. **प्रारंभिक बाल्यावस्था निगा व शिक्षण यांचे सबलीकरण**

या शिक्षणाचा उद्देश हा सन २०२५ पर्यंत ३-६ वयोगटातील प्रत्येक मुलाला मोफत, सुरक्षित, उच्च दर्जायुक्त, विकासात्मकदृष्ट्या योग्य निगा व शिक्षण प्रदान करणे हा आहे. सदर धोरण मुलांच्या जीवनातील प्रारंभिक बाल्यावस्थेतील शिक्षणाच्या महत्त्वावर आणि या शिक्षणामुळे व्यक्तीला संपूर्ण आयुष्यभर होणाऱ्या चिरंतन फायद्यांवर भर देते.स्थानिक गरजा,भौगोलिकता व विद्यमान पायाभूत सुविधा यांबाबत बहुआयामी दृष्टिकोन ठेवल्यास प्रारंभिक बाल्यावस्थेतील शिक्षणासाठी उपलब्ध असलेल्या सुविधांचा महत्त्वपूर्ण विस्तार आणि सबलीकरण होईल.विशेषतः सामाजिक-आर्थिकदृष्ट्या वंचित असलेले जिल्हे यांच्याकडे विशेष लक्ष पुरविले जाईल आणि त्यांना प्राधान्य दिले जाईल. दर्जा व निष्पत्ती यांची योग्य देखरेख करण्यासाठी प्रक्रिया अस्तित्वात आणण्यात येतील.शिक्षक व पालक या दोघांच्याही दृष्टीने विचार करून प्रारंभिक बाल्यावस्थेतील शिक्षणासाठी अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्र यांचा आराखडा विकसित करण्यात येईल. या आराखड्यामध्ये ०-३ वयोगटातील मुलांना योग्य आकलनात्मक उत्तेजना देण्यासाठी पूरक मार्गदर्शक सूचना व ३-८ वयोगटातील मुलांसाठी पूरक शैक्षणिक मार्गदर्शक सूचना यांचा समावेश असेल.

त्याचप्रमाणे सध्याच्या 'मनुष्यबळ विकास मंत्रालय' चे नाव बदलून 'शिक्षण मंत्रालय' करण्यात आले आहे. आणि प्रारंभिक बाल्यावस्थेतील शिक्षणाचे सर्व पैलू व घटक शिक्षण मंत्रालयाच्या कार्यकक्षेत येतील. परिणामतः प्रारंभिक बाल्यावस्थेतील शिक्षण उर्वरित शालेय शिक्षणाशी जोडण्यात येईल.शालेय शिक्षणाशी संबंधित नियमांचे अनुपालन होत असल्याची हमी मिळण्यासाठी सर्व शालेयपूर्व शिक्षण प्रदान करणाऱ्या (खाजगी, शासकीय व धर्मादायी) संस्थांकरिता प्रभावी दर्जेदार विनियमन किंवा प्रमाणन (ऍक्रेडीटेशन) प्रणाली निर्माण करण्यात येईल. त्याचप्रमाणे ३-६ वयोगटातील सर्व मुलांसाठी मोफत व सक्तीचे दर्जेदार शिक्षण उपलब्ध होत असल्याची दक्षता घेण्यासाठी 'शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९' (दी राईट टू एज्युकेशन ॲक्ट, २००९) चा विस्तार करण्यात येईल.

2. **सर्व मुलांना पायाभूत साक्षरता व अंकज्ञान आत्मसात होत असल्याची दक्षता**

या धोरणाचा उद्देश हा शालेय पातळीवर सन २०२५ पर्यंत इयत्ता पाचवी व त्यापुढील इयत्तेतील प्रत्येक विद्यार्थ्यास पायाभूत साक्षरता व अंकज्ञान आत्मसात होणे हा आहे. हे धोरण प्रारंभिक भाषा व गणित यांच्याशी निगडित गंभीर अध्ययन समस्या जाणते आणि त्यांच्या निवारणास सर्वोच्च प्राधान्य प्रदान करते.

पोषण व अध्ययन एकमेकांशी घनिष्टपणे संबंधित आहेत. त्यामुळे मध्यान्ह भोजन कार्यक्रमाचा विस्तार करण्यात येईल.इयत्ता पहिली ते पाचवीमध्ये प्रारंभिक भाषा व गणित यांच्याकडे विशेष लक्ष पुरविले जाईल. इयत्ता पहिली ते पाचवीमधील विद्यार्थ्यांना पायाभूत साक्षरता व अंकज्ञान आत्मसात व्हावे यासाठी व त्याचबरोबर मूल्यमापन व दर्जेदार साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी सशक्त प्रणाली उभी करण्या- वर वाढीव लक्ष केंद्रित करण्यात येईल. राष्ट्रीय शिक्षक पोर्टलवर भाषा व गणित साहित्य यांचा राष्ट्रीय स्तरावरील संग्रह (रिपॉझिटरी) उपलब्ध असेल. तसेच इयत्ता पहिलीमधील

सर्व विद्यार्थ्यांसाठी तीन महिन्यांचा कालावधी असलेला 'शालेय पूर्वतयारी अभ्यास' आयोजित करण्यात येईल. पायाभूत साक्षरता व अंकज्ञान यावर नव्याने भर देण्याच्या उद्देशाने सध्याच्या 'शिक्षक शिक्षणाची पुनर्रचना' करण्यात येईल. या धोरणात प्रत्येक शालेय स्तरावर विद्यार्थी-शिक्षक यांचे गुणोत्तर ३०:१ असे राहील, याची खात्री देण्यात येईल असे नमूद करण्यात आले आहे. या धोरणातील नाविन्यपूर्ण बाब म्हणजे समाजसेवक व समुपदेशक सर्व मुलांचे मानसिक आरोग्य अबाधित राखणे, मुले शाळा सोडून न जाणे, पालकांचा सहभाग व स्थानिक समुदायांची जमवाजमव करण्याची खात्री देतील. तसेच पायाभूत साक्षरता व अंकज्ञान संबंधित धोरणाची उद्दिष्टे पार पाडण्यासाठी स्वयंसेवकांचा उपयोग करण्यात येईल.

**3. सर्व स्तरावरील शिक्षणामध्ये सर्वांना वैश्विक प्रवेश व त्यांना शिक्षणप्रवाहात टिकवून ठेवणे**

या धोरणाचा असाही उद्देश आहे कि, सन २०३० पर्यंत ३- १८ वयोगटातील सर्व मुलांना मोफत व सक्तीच्या दर्जेदार शालेय शिक्षणास प्रवेश मिळून शिक्षणामध्ये त्यांचा सहभाग होणे या दृष्टीने प्रयत्न केले जाणार आहेत. मुलांचा शाळेमध्ये होणारा प्रवेश वाढत असला तरी मुलांची शाळेतून होणारी गळती आपल्याला थांबविता येत नसल्याबाबत हे धोरण चिंता व्यक्त करते. सन २०३० पर्यंत विविध उपाययोजनांच्या माध्यमा- तून शालेयपूर्व काळापासून ते माध्यमिक शिक्षणापर्यंत १००% ग्रॉस एनरोलमेंट रेशो साध्य करावयाचा आहे. शाळेत प्रवेश घेतलेल्या मुलांच्या दैनंदिन उपस्थितीचा व अध्ययनाच्या निष्पत्तीचा आढावा घेणे, तसेच शिक्षक, समाजसेवक व स्वयंसेवक यांच्यामार्फत शाळेतून गळती होणाऱ्या व शाळेत न येणाऱ्या मुलांच्या संख्येवर पाळत ठेवणे आणि शाळेबाहेरील पौगंडावस्थेतील मुलांसाठी कार्यक्रम राबवून मुलांचा शालेय शिक्षणातील सहभाग व अध्ययन वाढविले जाईल. औपचारिक व अनौपचारिक शैक्षणिक माध्यमांमधून अध्ययनाचे वेगवेगळे मार्ग उपलब्ध करून दिले जातील आणि सोबतच खुले शालेय शिक्षण (ओपन स्कूलिंग) व दूरवरून शालेय शिक्षण (डिस्टन्स स्कूलिंग) व तंत्रज्ञान मंच वापरण्याची साधने यांचे सबलीकरण करण्यात येईल.जर आरोग्यविषयक कारणास्तव विद्यार्थी शाळेत उपस्थित राहू शकत नसतील तर त्यांनी त्वरित शाळेत होण्यास आवश्यक असलेल्या उपाययोजना करण्यात येतील. त्यामध्ये शाळेत आरोग्यसेवकांची नेमणूक करणे, तसेच याविषयी विद्यार्थी, पालक व व्यापक प्रमाणावर समाजामध्ये जनजागृती करणे आणि त्यांना योग्य आरोग्य सेवांशी संपर्क करून देणे या बाबींचा समावेश होतो.शिक्षणाचा अधिकार अधिनियमाच्या अनुपालनाच्या आवश्यक बाबी व अटी शिथिल करण्यात येतील आणि त्याच- सोबत (शारीरिक व मानसिक) सुरक्षा, प्रवेश व समावेश, नफा- विरहित तत्त्वावर शाळांचे प्रचालन आणि अध्ययनाच्या निष्पत्तीची किमान मानके याबाबत खातरजमा करण्यात येईल. यामुळे स्थानिक पातळीवर गरजेनुसार बदल करून व पर्यायी विकल्प उपलब्ध करून शासकीय व गैरशासकीय संस्थांसाठी शाळा सुरू करणे सुलभ केले जाईल.शिक्षणाचा अधिकार अधिनियमाचा विस्तार करून शालेयपूर्व शिक्षणापासून इयत्ता बारावीपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण उपलब्ध करून देण्यात येईल.

**4. शालेय शिक्षणासाठी अभिनव अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्र रचना**

या धोरणानुसार घोकंपट्टीद्वारे करण्यात येणारे अध्ययन कमी करून त्याऐवजी सर्वांगीण विकास आणि शोधक विचारक्षमता, सर्जनशीलता, शास्त्रीय मनन, सुसंवाद, परस्परसहकार्य, बहु- भाषिकता, समस्या निवारण, नीतितत्त्वे, सामाजिक बांधिलकी व अंकीय साक्षरता अशा २१ व्या शतकातील अभिनव कौशल्यांवर आधारित अध्ययनाला चालना देण्यासाठी सन २०२२ पर्यंत अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्र यांमध्ये आमूलाग्र बदल करण्यात येणार आहेत. त्यादृष्टीने सध्याच्या शालेय शिक्षणाच्या अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्र अध्ययनार्थीच्या विकसनाच्या विविध टप्प्यांवर त्यांच्या गरजा व कल यांच्याशी सुसंगत होण्यासाठी अभ्यासक्रमाची व अध्यापनशास्त्राची पुनर्रचना करण्यात येईल.सध्याच्या शालेय शिक्षणाचा अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्र यांची रचना व शालेय शिक्षणाच्या अभ्यास- क्रमाचा आराखडा ५+३+३+४ मांडणीनुसार बनविला जाईल.

- पायाभूत स्तर (वय ३-८ वर्षे) : शीघ्र बौद्धिक खेळ व शोधनावर आधारित अध्ययन.
- तयारीचा स्तर (वय ८-११ वर्षे) : खेळ व शोधन यांच्यावर आधारित बांधणी; रचनात्मक अध्ययनाकडे संक्रमणाची सुरुवात.
- मधला स्तर (११-१४ वर्षे) : विषयांमधील संकल्पना शिकणे; पौगंडावस्थेतील वाटचालीस सुरुवात.
- दुसरा स्तर (वय १४-१८ वर्षे) : उदरनिर्वाह व उच्च शिक्षण यासाठी तयारी; युवा प्रौढत्वाकडे संक्रमण.

दुसऱ्या स्तरामध्ये चार वर्षांचा बहुशाखीय अभ्यासक्रम असेल आणि त्यामध्ये विषयातील खोली, शोधक विचारक्षमता, पर जीवनातील महत्त्वाकांक्षांकडे लक्ष देण्याची क्षमता विकसित केली जाईल आणि त्यामध्ये विद्यार्थ्यांना विषय निवडीस वाव असेल. सर्वांगीण अध्ययनार्थी विकसित करण्याच्या दृष्टीने शालेय शिक्षणाचे साहित्य व प्रक्रिया यांची

पुनर्रचना करण्यात येईल. अभ्यास अधिक खोलवर व्हावा व प्रायोगिक अध्ययन अधिक प्रमाणात व्हावे यासाठी अभ्यासक्रमाचा भार थोडासा कमी करून तो महत्त्वाच्या संकल्पना व आवश्यक कल्पना यांच्यापुरताच मर्यादित ठेवण्यात येईल. भाषा, शास्त्रीय मनन, सौंदर्यशास्त्र व कला यांची जाण, सुसंवाद, नैतिक कारणमीमांसा, अंकीय साक्षरता, भारताविषयी ज्ञान, स्थानिक समुदाय, देश व जगाला भेडसावत असलेल्या गंभीर व महत्त्वाच्या समस्यांचे ज्ञान यांमध्ये प्रभुत्व प्राप्त करण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले जाईल.अभ्यासक्रम लवचीक असेल ज्यामध्ये अभ्यास क्रमांतर्गत, सहअभ्यासक्रम किंवा अभ्यासक्रमबाह्य असा किंवा कला व विज्ञान असा किंवा 'व्यावसायिक' व 'शैक्षणिक' असा स्पष्ट भेद नसेल. त्यामुळे विद्यार्थ्यांना दुसऱ्या शालेय स्तरादरम्यान विषय बदलण्याची संधी व पर्याय उपलब्ध असतील.किमान इयत्ता पाचवीपर्यंत किंवा शक्यतो इयत्ता आठवीपर्यंत शिक्षण स्थानिक भाषेत/मातृभाषेत असेल आणि गरजेनुसार लवचीक भाषा (द्विभाषा) दृष्टिकोन अमलात आणण्यात येईल.गरजेनुसार व शक्य असेल तिथे उच्च दर्जाची पाठ्य- पुस्तके स्थानिक भाषेत उपलब्ध करून देण्यात येतील आणि दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य विकसित करण्यात येईल.संपूर्ण देशभरातून त्रिभाषीय सूत्र हिरिरीने राबविण्यात येईल. भाषा शिक्षक विकसित करून त्यांची नेमणूक करण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात येतील.इयत्ता ६ वी ते ८ वी दरम्यान सर्व विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्ये व कलाकुसर यांविषयी संपूर्ण एका वर्षाचा सर्वेक्षण (सर्व्हे) कोर्स करावा लागेल. यामुळे शालेय शिक्षणा- दरम्यानच मुलांना व्यावसायिक क्षेत्राचा अनुभव मिळण्यास सुरुवात होईल. इयत्ता ९ वी ते १२ वी मधील मुलांना पारंपरिकशैक्षणिक विषयांसोबतच व्यावसायिक विषयांची निवड करण्याची संधी असेल. त्याबाबत मुलांना दोन्ही प्रकारचे अभ्यासक्रम मिश्र पद्धतीने निवडण्याची मुभा असेल.

त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या विकासाला साहाय्य होईल अशा प्रकारे मूल्यमापनामध्ये आमूलाग्र बदल करण्यात येतील. (बोर्डाच्या परीक्षांसह) सर्व परीक्षा मुलांच्या मूळ संकल्पना व कौशल्ये आणि त्यासोबत उच्चस्तरीय क्षमता तपासतील. सन २०२५ पर्यंत मध्यस्तरीय व त्यावरील सर्व शालेय शिक्षणाचे मूल्यमापन अनुकूल संगणकीय चाचणी (ॲडाप्टिव्ह कम्प्युटराईझ्ड टेस्टिंग) पद्धतीने करण्यात येईल. सन २०२०-२१ पासून पुढे वर्षभरात शाळांमधून विविध बुद्धिमापन चाचण्या व निरनिराळ्या विषयांच्या चाचण्या घेण्यात येतील आणि स्वायत्त राष्ट्रीय चाचणी संस्थे- कडून या चाचण्यांचे प्रशासन करण्यात करण्यात येणार आहे. अशा रीतीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० उच्च दर्जाच्या शालेय शिक्षणाची हमी देणे. सदर धोरणानुसार होणारे बदल विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला पूरक ठरतील यात शंकाच नाही.

**संदर्भ ग्रंथ**

1.विभूते, भालबा (२०२२), राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चिकित्सा, पुणे, मेहता पब्लिशिंग हाउस

2.देशमुख लक्ष्मीकांत (२०२०). नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० : एक चिकित्सक अभ्यास, पुणे, आंतरभारती प्रकाशन

3. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० संक्षिप्त अहवाल